**<u>साक्षीदारास व्हीडिओ कॉन्फरन्सींग ची लिंक इमेल द्वारे जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे पाठविण्यात आली. साक्षीदार अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातून व्हिडीओ कॉन्फरन्सींग द्वारे साक्ष देत आहे. साक्षीदाराला सरकारी वकीलांनी ओळखले. तसेच साक्षीदाराने त्यांचे ओळखपत्र दाखविले व ते व्ही.सी.वर स्पष्ट दिसत आहे.</u>**

**<u>सेशन केस क्र ११ सन २०१८</u>** **निशाणी ५६.**

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ७ ची साक्ष

मी या द्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | अन्सार राजमोहमंद इनामदार, |
| वय सुमारे | - | ६३ वर्ष |
| उद्योग | - | सेवानिवृत्त. |
| निवास स्थान | - | अहिल्यानगर, ता. जि. अहिल्यानगर. |

**<u>इन कॅमेरा</u>**

**<u>सरतपासणी - सहायक सरकारी वकील श्री. जे. के. दिवटे यांचेतर्फे -</u>**

१. डिसेंबर २०१७ या महिन्यात मी घारगाव पोलिस स्टेशन येथे पोलिस निरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. दि. ०३/१२/२०१७ रोजी विठाबाई कचरे या फिर्याद देण्यासाठी तिच्या मुलीसह घारगांव पोलिस ठाण्यात आल्या होत्या. दि. ३०/११/२०१७ रोजी दुपारी १ ते १.२० या कालावधीत फिर्यादीची पिडीत मुलगी वय १९ जी मतिमंद होती ती घरात एकटीच होती त्यावेळी फिर्यादी ही शेतात धुणे धुण्यासाठी गेली होती. फिर्यादी जेव्हा घरी परत आली तेव्हा पिडीतेने तिला सांगितले की एका भिल्लाच्या मुलाने तिच्यावर (पिडीतेवर) बलात्कार केला व पिडीतेच्या अवघड ठिकाणी दुखत होते. फिर्यादीने पाहिले असता फिर्यादीचे अंगावरील टॉप फाटलेला होता, पिडीतेच्या अंगावर सलावर व चड्डी नव्हती. तिच्या गळयावर व छातीवर खरचटलेले होते. त्याचवेळी फिर्यादीला शेताजवळुन एक मुलगा जाताना दिसला. त्यावेळी फिर्यादी त्याला म्हणणाली की मी तुला पोलिस ठाण्यात नेते तो मुलगा स्वत:च्या चप्पाला सोडुन पळुन गेला. फिर्यादीने त्या मुलाचे नाव गिताराम भिल्ल असे सांगितले. फिर्यादीमध्ये तिने असेही सांगितले की, त्यांच्या शेजारी राहणार काशिनाथ कडाळे याने तो प्रकार पाहिला होता.

२. फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे मी प्रथम खबर नोंदविली. सदर प्रथम खबर मला दाखविली ती तिच आहे. त्यावर माझी सही असुन फिर्यादीचा अंगठा आहे. सदर प्रथमखबरला निशाणी क्रमांक ५७ दिला.

३. फिर्याद दिल्यानंतर फिर्यादीने पिडीत मुलीचे कपडे हजर केले ते मी पंचासमक्ष जप्त केले. सदर पंचनामा निशाणी क्रमांक ५१ दाखविला तो तोच आहे. त्यावर माझी व पंचांच्या सहया असुन त्यावर फिर्यादीचा अंगठा आहे. ते कपडे म्हणजे एक हिरव्या रंगाचा टॉप, हिरव्या रंगाची चुस्ती/सलवार, पिवळया रंगाची स्लिप फाटलेली होती, निळया रंगाची निकर व आरोपीच्या चप्पला असे फिर्यादीने हजर केले होते. मी भारतीय दंड संहिता कलम ३७६ (2)(l) दाखल करुन तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. थोरात यांच्याकडे दिला.

सरतपास पूर्ण.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री जे. एच. वामन मार्फत</u>**

४. दि. ०३/१२/२०१७ रोजी मी ठाणे अंमलदार नव्हतो. अदल्या दिवशी पोलिस ठाण्यात नेमणुक तक्ता तयार होतो हे म्हणणे खरे आहे. त्यानुसार २४ तासाच्या नेमणुका होतात हे म्हणणे खरे आहे. दि. ०३/१२/२०१७ रोजी ठाणे अंमलदार कोण होते हे मला आठवत नाही. त्यावेळी पोलिस ठाण्याचे इन्चार्ज पोलिस निरीक्षक श्री. निघोट होते. फिर्यादी ही आधी निघोट साहेबांकडे गेली होती का हे मला आठवत नाही, परंतु निघोट साहेबांशी मी चर्चा केली होती व त्यांच्या आदेशाप्रमाणे गुन्हा दाखल केला होता. फिर्याद कशी घ्यायची ती निघोट साहेबांनी सांगितले त्याप्रमाणे मी ती घेतली हे म्हणणे खरे नाही. मी ठाणे अंमलदार नसल्यामुळे मला प्रथमखबर घेण्याचा व गुन्हा नोंदविण्याचा अधिकार नव्हता हे म्हणणे खरे नाही.

५. "दि. ३०/११/२०१७ रोजी दुपारी १ ते १.२० या कालावधीत फिर्यादीची पिडीत मुलगी वय १९ जी मतिमंद होती ती घरात एकटीच होती त्यावेळी फिर्यादी ही शेतात धुणे धुण्यासाठी गेली होती. फिर्यादी जेव्हा घरी परत आली तेव्हा पिडीतेने तिला सांगितले की एका भिल्लाच्या मुलाने तिच्यावर (पिडीतेवर) बलात्कार केला व पिडीतेच्या अवघड ठिकाणी दुखत होते. फिर्यादीने पाहिले असता फिर्यादीचे अंगावरील टॉप फाटलेला होता,

पिडीतेच्या अंगावर सलावर व चड्डी नव्हती. तिच्या गळयावर व छातीवर खरचटलेले होते. त्याचवेळी फिर्यादीला शेताजवळुन एक मुलगा जाताना दिसला. त्यावेळी फिर्यादी त्याला म्हणणाली की मी तुला पोलिस ठाण्यात नेते तो मुलगा स्वत:च्या चप्पाला सोडुन पळुन गेला. फिर्यादीने त्या मुलाचे नाव गिताराम भिल्ल असे सांगितले. फिर्यादीमध्ये तिने असेही सांगितले की, त्यांच्या शेजारी राहणार काशिनाथ कडाळे याने तो प्रकार पाहिला होता" हा फिर्यादीतील मजकुर खोटा आहे हे म्हणणे खरे नाही. फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे मी फिर्याद घेतली हे मी खोटे सांगतो हे म्हणणे खरे नाही.

६. तपास माझ्याकडे सोपवलेला नव्हता. दि. ०३/१२/२०१७ रोजी तपास उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याकडे तपास दिला हे म्हणणे खरे आहे. फिर्यादीला पुरक होईल असा खोटा कपडे जप्ती पंचनामा मी अधिकार नसताना केला हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/---

संगमनेर
दिनांक १६/०२/२०२६.

( मंदार नेरलेकर )
अति. सत्र न्यायाधीश
संगमनेर